# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

**अधिसूचना**

क्रमांक:२अ/एडीएम/थेट द्वि व/२००९/ 9e.eC
दिनांक : 30 JUN 2009

**शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत करण्याबाबत...**

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय / शासकीय अनुदानीत/ विनाअनुदानीत संस्थांमधील सर्व रिक्त जागा मल्टिपल राऊंडद्वारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय / शासकीय अनुदानीत/ विनाअनुदानीत संस्थांमधील मंजूर प्रवेश क्षमतेच्या लॅटरल एन्ट्रीद्वारे भरावयाच्या जागांसह प्रथम वर्षामधून अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या रिक्त जागासुध्दा मल्टिपल राऊंडद्वारे **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यात येणार आहेत.**

थेट द्वितीय वर्षातील सर्व प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीईसी२००९/(१५/०९)/तांशि-४, दिनांक २५.६.२००९ व जीईसी२००९/(१६/०९)/तांशि-४, दिनांक २५.६.२००९ नुसार आदेश निर्गमित झाले असून त्यातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

१) **ज्या संस्था दुस-या वर्षाच्या रिक्त जागा संचालक, तंत्रशिक्षण यांना कळविणार नाहीत, अशा संस्थांविरुध्द भारतीय दंड विधान संहिता १८६० मधील कलम १८८ नुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.**

२) **संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहीत केलेल्या मुदतीनंतर प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती उशिरा अपलोड करणा-या संस्थांवर उशिरा अपलोड केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या गुणिले शिक्षण शुल्क गुणिले दोन एवढी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात येईल.**

तरी संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय / शासकीय अनुदानीत/विद्यापीठ व्यवस्थापित/विद्यापीठ संस्था/ विनाअनुदानीत अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांनी **थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या जागांवर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपेपर्यंत कोणतेही प्रवेश संस्थांस्तरावर करू नयेत**. तसे केल्यास सदर प्रवेशास मंजूरी देण्यात येणार नाही व अशा संस्थांवर वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. थेट द्वितीय वर्षासाठीची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा संस्थास्तरावर भरता येतील.

विद्यार्थ्यांनी थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या जागांसाठी थेट संस्थेकडे प्रवेश घेतल्यास सदर प्रवेशास मंजूरी देण्यात येणार नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी सर्वस्वी जबाबदार असेल त्यास तंत्रशिक्षण संचालनालय जबाबदार असणार नाही.

( डॉ. एस के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Rajesh\Admission 09-10\Engineering\notification of DSE for institutes.doc